महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : एचएमआर-१६२५/प्र.क्र.१६२/२०२५/जाहिरात** **जाहिरात क्रमांक - १२६/२०२५**

माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन, शासनाच्या गृह विभागाच्या मागणीनुसार राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण, मुंबई येथील रिक्त असलेल्या **सदस्य- नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती** या पदावर नियुक्तीकरीता अर्हताप्राप्त उमेदवारांचे पॅनल तयार करुन देण्याकरीता इच्छुक व अर्हताधारक पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१. अर्ज करावयाच्या पदाचे नांव :- सदस्य - नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती, राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण, मुंबई. (०१ पद)**

**२. नियुक्तीचा कालावधी :- ०३ वर्षे**

**३. वेतन व भत्ते :- रुपये १,४४,२००/- दरमहा अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते.** (शासन अधिसूचना, गृह विभाग, दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ मधील तरतुदी लागू राहतील.)

**४. वय, शैक्षणिक अर्हता व अनुभव :-**

**४.१ वयोमर्यादा :- किमान ४० वर्षे पूर्ण असावे.**

**४.२ शैक्षणिक अर्हता :- किमान पदवीधर (प्राधान्याने लोक प्रशासन, राज्यशास्त्र, समाजशास्त्र या शाखेतील पदवी), विधी पदवीधर.**

**४.३ अनुभव :- किमान १० वर्षांचा शासकीय सेवा/वकीली/मानवी हक्कांबाबत काम केल्याचा अनुभव, जो प्राधिकरणाचे कामकाज पार पाडताना उपयोगात येईल, असे शासनाचे मत असेल.**

**५. इतर अटी :-**

**५.१** अर्जदारास न्यायालयाने सिध्दापराधी ठरविलेले नसावे किंवा न्यायालयात गुन्ह्याचे दोषारोप ठेवलेले नसावे.

**५.२** अर्जदारास शासकीय सेवा, निमशासकीय किंवा खाजगी सेवा यांमधून बडतर्फ केले किंवा काढून टाकले किंवा भ्रष्टाचार किंवा अकार्यक्षमता किंवा नैतिक अध:पतन किंवा कोणत्याही प्रकारची गैरवर्तणूक या कारणांवरुन सक्तीने सेवानिवृतत केलेले नसावे.

**५.३** अर्जदार कोणतेही सार्वजनिक पद धारण करण्यापासून किंवा कोणतीही निवडणूक लढविण्यापासून मनाई केलेली नसावी.

**५.४** अर्जदाराने शासनाने बंदी घातलेल्या कोणत्याही संघटनेशी/संस्थेशी/पक्षाशी संबंधित नाही, असे स्व-घोषणापत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

**५.५** अर्जदार शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास सदर पदावर निवड झाल्यानंतर नियुक्तीपूर्वी सदर पदाचा राजीनामा देण्याबाबत स्व-घोषणापत्र व संबंधित कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

६...

**६. सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

**६.१** महाराष्ट्र पोलीस (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, २०१४, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ अन्वये पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली असून त्यातील नियमांनुसार तसेच वेळोवेळी सुधारण्यात येणा-या कार्यनियमावली / कार्यपध्दतीनुसार प्रस्तुत पदाची निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. प्रस्तुत प्रकरणी शासन अधिसूचना, गृह विभाग, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१६ व दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ अन्वये विहित केलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण (सेवेच्या शर्ती) नियम, २०१६ मधील तरतुदी लागू राहतील.

**६.२** नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र मान्यवर व्यक्तींनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात टंकलिखित करुन आयोगास **"उप सचिव, (सरळसेवा - छाननी) महाराष्ट्र लोकसेवा आयोग, त्रिशुल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४"** यांचे नावे **दिनांक २२ डिसेंबर, २०२५ पर्यंत** पोहोचतील, अशा बेताने पाठवावे. कोणत्याही कारणास्तव अंतिम दिनांकानंतर प्राप्त झालेले अर्ज ग्राह्य न समजता रद्द करण्यात येतील. (अर्ज नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात यावेत.)

**६.३** अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी प्रस्तुत जाहिरातीमधील अनुक्रमांक ४ मध्ये नमूद केल्यानुसार वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर अनुषंगिक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. याचा तपशील अर्जाच्या नमुन्याच्या शेवटी दिला आहे.

**६.४** अर्जासोबत कोणतीही कागदपत्रे सादर न केल्यास सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**६.५** सदर पदभरतीची संपूर्ण जाहिरात व अर्जाचा नमुना आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

ठिकाण : नवी मुंबई.
दिनांक : २८ नोव्हेंबर, २०२५.

उप सचिव (जाहिरात),
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

# <u>अर्जाचा नमुना</u>

राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण, मुंबई येथील रिक्त असलेल्या **सदस्य- नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती** या पदावर नियुक्तीकरीता अर्हताप्राप्त उमेदवारांचे पॅनल तयार करुन देण्याबाबत इच्छुक व अर्हताप्राप्त पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**(१) अर्ज करावयाच्या पदाचे नांव :- सदस्य - नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती, राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण, मुंबई. (०१ पद)**

**(२) उमेदवाराचे संपूर्ण नांव :-** ------------------------------------------------------------------

**(३) संपर्क तपशील :-**

३.१ सध्याचा पत्ता - ------------------------------------------ ३.२ कायमचा निवासी पत्ता - ---------------------------------------

दुरध्वनी क्रमांक - --------------------------------------- ----------------------------------------------

ई मेल - ------------------------------------------------- ----------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक - ------------------------------------- ---------------------------------------------

**(४) जन्मदिनांक :-**

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

**(५) सध्याचे वय :-** -------------------------------

**(६) शैक्षणिक अर्हता :-**

| Sr. No. | Qualification Type | Compulsory Subject | Optional Subject | Board/University | Percentage | Class/ Grade |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**(शैक्षणिक अर्हतेच्या स्व-साक्षांकित झेरॉक्स प्रती अर्जासोबत जोडाव्यात)**

**(७) अनुभवाचा तपशील :-**

| Sr. No. | Institution/ Department/ Organization/ Court | Designation (Post Held) | Nature of Job | Pay Band/ Pay Scale | Monthly Gross Salary/ Income | Experience | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | From Date | To Date |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

**(अनुभवासंदर्भातील कागदपत्रांच्या स्व-साक्षांकित झेरॉक्स प्रती अर्जासोबत जोडाव्यात)**

**(८) विशेष प्राविण्य :-**

**(९) सेवेतील उल्लेखनीय कामगिरी :-**

**(१०) इतर अटी :-**

**१०.१** अर्जदारास न्यायालयाने सिध्दापराधी ठरविले आहे काय? किंवा न्यायालयात गुन्ह्याचे दोषारोप ठेवलेले आहे काय?. - **होय / नाही.**

**१०.२** अर्जदारास शासकीय सेवा, निमशासकीय किंवा खाजगी सेवा यांमधून बडतर्फ केले किंवा काढून टाकले किंवा भ्रष्टाचार किंवा अकार्यक्षमता किंवा नैतिक अध:पतन किंवा कोणत्याही प्रकारची गैरवर्तणूक या कारणांवरुन सक्तीने सेवानिवृत्त केले आहे काय? - **होय / नाही.**

**१०.३** अर्जदारास कोणतेही सार्वजनिक पद धारण करण्यापासून किंवा कोणतीही निवडणूक लढविण्यापासून मनाई केलेली आहे काय? **- होय /नाही.**

**१०.४** अर्जदाराने शासनाने बंदी घातलेल्या कोणत्याही संघटनेशी/संस्थेशी/पक्षाशी संबंधित नाही, असे स्व-घोषणापत्र अर्जासोबत सादर केले आहे काय? **- होय / नाही.**

**१०.५** अर्जदार शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास सदर पदावर निवड झाल्यानंतर नियुक्तीपूर्वी सदर पदाचा राजीनामा देण्याबाबत स्व-घोषणापत्र व संबंधित कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत सादर केले आहे काय? - **होय / नाही.**

**(११) आपल्या विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई/विभागीय चौकशी अथवा अन्य चौकशी चालू आहे का?/ होती का? :- होय / नाही**

(असल्यास त्याबाबतचा तपशील नमूद करावा) :-

मी, श्री/श्रीमती ...................................................................................... असे प्रमाणित करतो/करते की, मी, राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण- मुंबई येथील रिक्त असलेल्या **सदस्य- नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती** या पदावर नियुक्तीकरीता प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील तपशील, अटी व शर्ती वाचल्या असून, सदर पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत असल्याने सदर पदावर नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खरी असून, खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जाऊ शकतो, याची मला जाणीव आहे.

सही - ............................................

दिनांक :- ...........................................

अर्जदाराचे संपूर्ण नाव - ............................................

**अर्जासोबत सादर केलेली सहपत्रे –**

| अ.क्र. | अर्जातील दावा | प्रमाणपत्र/कागदपत्र |
|---|---|---|
| १ | नाव | (१) एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता<br>(२) उमेदवाराने एस.एस.सी. अर्हता धारण न करता दूरस्थ पध्दतीने पदवी धारण केली असल्यास पदवीचे प्रमाणपत्र अथवा पदवीचे अंतिम वर्षाचे गुणपत्रक |
| २ | ओळखीचा पुरावा<br>(यापैकी कोणतेही एक) | (१) आधारकार्ड<br>(२) निवडणूक आयोगाचे ओळखपत्र<br>(३) पासपोर्ट<br>(४) पॅनकार्ड<br>(५) स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स |
| ३ | वयाचा पुरावा<br>(यापैकी कोणतेही एक) | (१) मॅट्रिकचे प्रमाणपत्र/माध्यमिक शालांत प्रमाणपत्र<br>(२) विहित नमुन्यातील सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले वयाचे प्रमाणपत्र<br>(३) शासनाच्या स्थायी सेवेतील उमेदवारांच्या बाबतीत – उपरोल्लेखित प्रमाणपत्र किंवा त्यांच्या अभिलेख्यात नोंदविलेला त्यांचा जन्मदिनांक नमूद करणाऱ्या सेवा अभिलेख्यातील उताऱ्याची प्रत (अर्जात दावा केला असल्यास)<br>(४) जन्म दिनांक नमूद असलेला शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला<br>(५) नगर पालिका/महानगरपालिका/ग्रामपंचायतीचा जन्म दाखला |
| ४ | शैक्षणिक अर्हता | (१) पदवीच्या अंतिम वर्षाचे गुणपत्रक<br>(२) पदवी प्रमाणपत्र |
| ५ | अनुभवाचे प्रमाणपत्र | संबंधित संस्थेच्या नाममुद्रीत पत्रावर (LETTERHEAD) सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले सविस्तर व परिपूर्ण अनुभव प्रमाणपत्र. त्यामध्ये उमेदवाराचे नाव, धारण केलेल्या पदाचे नाव, पदाचा तपशील, पदाची वेतनश्रेणी, अनुभवाचा एकूण कालावधी व पदावरील नेमणूकीचे स्वरुप इत्यादी स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक राहील. |
| ६ | स्व-घोषणापत्र | अर्जदाराने शासनाने बंदी घातलेल्या कोणत्याही संघटनेशी/संस्थेशी/पक्षाशी संबंधित नाही, असे स्व-घोषणापत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील. |
| ७ | ना- हरकत प्रमाणपत्र | अर्जदार शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत असल्यास सदर पदावर निवड झाल्यानंतर नियुक्तीपूर्वी सदर राजीनामा दिल्याबाबत व संबंधित कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे अनिवार्य राहील. |